# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ३५**

**(सभावृत्तांत)**

दिनांक – १५/११/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १५/११/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.खोत,मा.बहुरे,मा.राऊत,मा.दांगट -सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.थोरात, मा.कुलकर्णी, मा.खाबडे,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे,मा.औंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड, मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील,मा.घुबे,मा.देशमुख-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ३२) | निविदा क्र.०७/२०१७-१८ Appointment of Principal Consu;tant for Setting-up & Managing the City Transformation Office aimed at driving Key City Development Projects for Pimpri-Chinchwad City चे अनुषंगाने कामकाज करुन घेणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणेबाबत... |
| विषय क्रमांक ३३) | स्तुप कन्सल्टंट यांची नेमणूक करणेबाबत – मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३४) | पिंपरी चिंचवड हद्दीमधील अंशदायी योजनेअंतर्गत रुग्णालयांची यादी तयार करुन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत-मा.निर्मला कुटे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३५) | प्र.क्र.२१ दळवीनगर येथे विरंगुळा केंद्र बांधणेच्या कामासाठी वास्तुविशारद नेमणूक करणेबाबत – मा.माधुरी कुलकर्णी, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३६) | प्र.क्र.७ च-होली मुख्य रस्ता दाभाडे वस्ती ते इंद्रायणी नदीपर्यंतचा ४५ मी. रुंद रस्ता सी.डी. वर्क सह विकास आराखड्यानुसार विकसित आराखड्यानुसार विकसित करणेबाबत – मा.निर्मला कुटे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३७) | प्र.क्र.६ डुडुळगाव गट नं.१८ व २४ मी. विकास आराखड्यातील मोशी आळंदी रस्ता माऊली नगर ते पुणे आळंदी रस्ता विकसीत करणेबाबत – मा.निर्मला कुटे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३८) | डांगे चौक थेरगाव येथे दुमजली उड्डाणपूल बांधणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३९) | मनपाचे किर्ती महाविद्यालय इमारतीचा दुसरा मजला भाड्याने देणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ४०) | पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदीर ते सृष्टी चौकापर्यंतचा १८.०० मी. रुंद रस्त्याचे अद्ययावत पद्धतीने नुतनीकरण करणे या कामाकरीता सल्लागार नेमणुकीबाबत – मा.उषा मुंढे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ४१) | मे.स्तुप कन्सल्टंट यांची नेमणूक करणेबाबत – मा.मोरेश्वर भोंडवे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ४२) | मे.स्तुप कन्सल्टंट यांची नेमणूक करणेबाबत-मा.मोरेश्वर भोंडवे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |

विषय क्रमांक ४३) सेवा संपुष्टात आणण्याची कारवाई मागे घेणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

---------

(उत्कृष्ट आर्थिक नियोजन करुन महापालिकेच्या गंगाजळीत ६५ कोटी रुपयांची भर घातल्याबद्दल मा.सभापती व सर्व स्थायी समिती सदस्यांचे वतीने मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर आणि मा.मुख्यलेखापाल श्री.राजेश लांडे यांचा पुष्पगुच्छ देवून मा.स्थायी समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.)

---------

ठराव क्रमांक –१२७७ विषय क्रमांक – १

दिनांक – १५/११/२०१७ विभाग–नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ –१) मा.सागर गवळी, मा.शैलेंद्र मोरे यांचा प्रस्ताव-

२) मा.शहर सुधारणा समिती, ठराव क्रमांक २८, दिनांक ३१/१०/२०१७ अन्वये,

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** लेखाशिर्ष उपलब्ध नसल्याने आणि नवीन काम थेट पद्धतीने देता येणार नाही. म्हणून वि.क्र.१ फेटाळण्यात येत आहे.

**२)** निश्चितपणे मागासवर्गीय पुरुषांसाठी योजना आणल्या पाहीजेत. दि.२० नोव्हेंबर रोजी होणा-या मा.महापालिका सभेत लेखाशिर्ष ओपन करणेकामी मा.पक्षनेते यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यानुसार लेखाशिर्ष ओपन करुन घ्यावे आणि निविदा प्रक्रिया राबवावी.

----------

ठराव क्रमांक –१२७८ विषय क्रमांक – २

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– लेखा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९९५२/२०१७ दि.६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सह शहर अभियंता, BSUP प्रकल्प विभाग यांनी दि.१३/१०/२०१७ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात प्रथम प्राधान्याने करावयाच्या विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यातील चालू कामांसाठी तरतुदी मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच जी कामे दुय्यम प्राधान्याने करावयाची आहेत अशा कामांसाठी अपु-या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. म्हणून विभागाअंतर्गत र.रू.९,००,०००/- भांडवली वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१२७९ विषय क्रमांक – ३
दिनांक – १५/११/२०१७ विभाग– लेखा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९९५३/२०१७ दि.६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता फ क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.०४/१०/२०१७ चे प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-२०१८च्या अंदाजपत्रकामध्ये फ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विषयक कामांना तरतूद कमी पडत असल्याने तरतूद रक्कम रुपये ४२,०१,६६०/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८० विषय क्रमांक – ४
दिनांक – १५/११/२०१७ विभाग– आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/७१६/२०१७ दि.०३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र. ३/२०१४-१५ प्रसिध्द करुन मनपाचे अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था/बेरोजगारांच्या सहकारी सेवासंस्था/मजूर सहकारी संस्था यांचेकडून किमान वेतन दराने कामगार उपलब्ध करणे या कामासाठी २ वर्ष कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामासाठी प्राप्त ८७ निविदाधारकांपैकी पात्र ठरलेल्या ६८ संस्थाना अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई करणेसाठी एकूण ९२५ कामगार किमान वेतन दराने पुरविणेस मान्यता दिली असुन सदर कामाची मुदत दि.३१/३/२०१७ रोजी संपली आहे. सदर कामाची नविन निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ प्रसिध्द केली असुन त्यास (१) पिं.चिं.शहर स्वंयरोजगार सेवा सह संस्थांचे फेडरेशन मर्या. व (२) श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार सेवा सह. संस्था मर्यादीत यांनी मे.मुबई हायकोर्टात याचिका दाखल केली असल्याने दि.१/८/२०१७ पासुन दि.३०/९/२०१७ पर्यंतचे मुदतवाढीचे कामास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ९३१ दि.१३/९/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे. मे.मुबई हायकोर्टात याचिकेची पुढील सुनावणी दि.२/११/२०१७ रोजी आहे. यापुर्वीच्या मे.कोर्टाचे आदेशानुसार निविदा कार्यवाही सुरु ठेवावी तथापि मे.कोर्टाचा आदेश मिळाले शिवाय कामाचा अंतिम आदेश देवु नये असे नमुद केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील रस्ते, गटर्स यांची दैनंदिन साफसफाई होणे नागरिकांचे आरोग्याशी संबंधीत असुन सदर साफसफाई न झाल्यास नागरिकांचे आरोग्यावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब सदरचे काम बंद करणे उचित होणार नाही. सबब सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ६४ (स्वंयरोजगार/बेरोजगार) संस्थाकडून ६ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईसाठी कार्यरत असलेल्या प्रस्तावा

सोबतचे प्रपत्र - अ मध्ये नमुद ९२५ कामगारांना दिनांक १/१०/२०१७ पासून ३ महिने अथवा मे. मुंबई हायकोर्टाचा आदेश झालेनंतर नवीन संस्थांना नेमणुक आदेश देईपर्यंत यापैकी प्रथम होईल त्या कालावधीसाठी मुदतवाढ घेणे आवश्यक असल्याने कामगार कल्याण विभागाने दि.२६/०९/२०१७ चे आदेशान्वये दि.१/७/२०१७ पासुन सफाई कामगारांचा किमान वेतन दर र.रु.१६,६०९.३४ कळविला आहे. त्यानुसार ९२५ कामगारांचा मासिक खर्च र.रु. १,५३,६३,६४०/- नुसार ३ महिने कालावधीसाठी र.रु.४,६०,९०,९२०/-चे अपेक्षित खर्चास, त्यांचेशी मुदतवाढ कालावधीचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास तसेच प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८१ विषय क्रमांक – ५

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/७१७/२०१७ दि.०३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालय स्तरावर रस्ते/गटर सफाई कामासाठी किमान वेतन दराने कामगार पुरविणे कामासाठी ई-निविदा नोटीस क्र.३/२०१४-१५ नुसार निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी पात्र ठरलेल्या ६८ संस्थांकडून दिनांक १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ या कालावधीसाठी एकूण ८६५ कामगार किमान वेतन दराने उपलब्ध करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.१५९६२ दिनांक १२/४/२०१६ अन्वये मान्यता देणेत आली आहे. तसेच ६ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रत्येकी १० याप्रमाणे एकूण ६० वाढीव कामगारासह एकूण ९२५ कामगार उपलब्ध करणेस मा. स्थायी समिती ठराव क्र.१५२७८ दिनांक २६/२/२०१६ अन्वये मान्यता देणेत आली आहे. तसेच निविदा २ वर्षे कालावधीची असल्याने सदर संस्थांचे कामकाज अहवाल, मा.आयुक्त व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १५९६२, दिनांक १२/४/२०१६ अन्वये दिनांक १/४/२०१६ ते दि.३१/३/२०१७ पर्यंत मान्यता दिली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३७८, दि. १७/५/२०१७ अन्वये दि.१/४/२०१७ पासुन ४ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नवीन संस्थांना नेमणुक आदेश देईपर्यंत यापैकी जी प्रक्रिया प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार सदर संस्थांचे काम दि.३०/७/२०१७ रोजी संपले आहे. सदर कामाची नविन निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ प्रसिध्द केली असुन त्यास (१) पिं.चिं.शहर स्वंयरोजगार सेवा सह संस्थांचे फेडरेशन मर्या. व (२) श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार सेवा सह.संस्था मर्यादीत यांनी मे.मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली असल्याने दि.१/८/२०१७ पासुन दि.३०/९/२०१७ पर्यंतचे मुदतवाढीचे कामास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ९३१ दि. १३/९/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे “फ” क्षेत्रीय कार्यालयाकडील १५ संस्थांकडून एकूण २०७ कामगार उपलब्ध करणेत आलेले आहेत. यापैकी मे.समता विकास स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांचेकडून प्रभाग क्र.१ रुपीनगर,तळवडे येथे दररोज

१४ कामगारांकडून रस्ते,गटर्स यांची साफसफाई करण्यात येत आहे. सदर संस्थेने दि.१/७/२०१७ चे पत्रान्वये त्यांना दि.१/८/२०१७ पासुन आर्थिक अडचणीमुळे काम करता येणार नसल्याचे कळविले आहे. तसेच मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी सदर संस्थेचे काम श्री लोकसेवा स्वंयसहाय्यता संस्था करण्यास तयार असुन त्यांना देण्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार मे.समता विकास स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांचे दि.१/८/२०१७ पासून काम बंद करुन श्री लोकसेवा स्वंयसहाय्यता संस्था यांना त्यांचे १३ व मे. समता विकास स्वयं.सह.संस्थेचे १४ असे एकूण २७ कामगार पुरविणचे अतिरिक्त काम देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८२ | विषय क्रमांक – ६

दिनांक – १५/११/२०१७ | विभाग–शिक्षण मंडळ कार्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.शिमं/९अ/कावि/१०८/२०१७ दि.०६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील संगणक यंत्रणा देखभाल दुरुस्तीकामी मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली. यांना शि.मं/९अ/१५४अ/२०१६ दि. २६/०७/२०१६ अन्वये कामाचे आदेश देण्यात आले होते. सदर कामकाजाची मुदत ३०/०९/२०१७ रोजी पूर्ण झालेली आहे. त्यांना र.रु.१,९८,०००/- चे आदेश देण्यात आले होते. सदर आदेश फक्त शिक्षण मंडळ कार्यालयातील संगणक यंत्रणेसाठी देण्यात आले होते. शिक्षण मंडळाच्या १३२ शाळांना प्रत्येकी दोन संगणक आणि एक प्रिंटर देण्यात आला आहे. सदर संगणकांचा हमी कालावधी समाप्त झालेला आहे त्यामुळे एकूण ३२० संगणक आणि ३० प्रिंटर च्या देखभाल दुरुस्तीसाठी निविदा प्रसीध्द करण्यात आली आहे. सदर निविदा उघडणेचे कामकाज चालू आहे सदर प्रक्रीया पूर्ण होणेकामी अजून एक तेदिड महीन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली. यांना पुढील तिन महीन्यासाठी म्हणजेच दि. ३१/१२/२०१७ पर्यंत र.रु.४९,५००/- चे कामाचे आदेश देणेकामी प्रस्तावीत आहे. त्यामुळे सर्व संगणक यंत्रणा सुरळीत राहण्यास मदत होणार आहे. सदर खर्च संगणक देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२८३ विषय क्रमांक – ७
दिनांक – १५/११/२०१७ विभाग–क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/९१०/१७ दि.०१/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार दीन महीला आधार रोज. संस्था यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४/- या दराने १ ट्रक वाहने दि.२५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. १ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१७६५९ दि.०४/१०/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. क्र.प्रशा/०२/कावि/४६०/२०१७, दि.०७/०८/२०१७ नुसार नविन क्षेत्रिय कार्यालयांची निर्मीती झालेली असुन नविन कार्यालयांच्या निर्मिती नुसार प्रभाग क्र.२ चिखली, मोशी या परिसराचा समावेश क क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात समाविष्ट करणेत आलेला आहे. सदरच्या भागातील कुदळवाडी,जाधववाडी या परीसरात मोठया प्रमाणात भंगार मालाची दुकाने तसेच मोठया प्रमाणत नागरीकरण झाल्याने घरोघरचा कचरा उचलणे व वाहतूक करणेची यंत्रणा अपुर्ण पडत असल्याने सन्मा. सदस्य व आरोग्य निरिक्षक, मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.२ मध्ये २ वाढीव ट्रक वाहनाची मागणी केलेली आहे. क क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव १ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. त्याचप्रमाणे परीसरातील गोळा करणेत आलेला कचरा उचलणेसाठी १ ट्रक असे एकुण २ ट्रक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे म्हणुन दीन महीला आधार रोज. संस्थायांचेशी कचरा उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन १ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३४ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार दीन महीला आधार रोज. संस्थायांचेकडून मोशी डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४/- या दराने आणखी २ वाढीव ट्रक वाहने दि.३१/०८/२०१७ ते २५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** मा.सहा.आयुक्त,प्रशासन यांना निर्देश आहेत की, प्रभागांमध्ये कचरा उचलण्यासाठी वाहने उपलब्ध आहेत पण वाहनचालकांची कमतरता आहे, अशी परिस्थिती आहे तर पदाधिकारी यांच्याकडील वाहनांवरील रिक्त होणारे वाहनचालक,प्रभाग अधिकारी यांच्याकडील वाहनचालक, जे सध्या पदाधिका-यांकडे कार्यरत नाहीत, अशा वाहनचालकांची नेमणूक या गाड्यांवर करण्यात यावी.

**२)** सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्यांच्या प्रभागामध्ये किती व्हिल बॅरोज्, बीटरबीन्स, कंटेनर्सची आवश्यकता आहे याचे मागणीपत्र आज संध्याकाळपर्यंत मा.सहा.आयुक्त,आरोग्य यांच्याकडे द्यावे.

**३)** शहरातील ज्या भागांत कच-याचा टेम्पो जाऊ शकत नाही. अशा ठिकाणी प्लॅस्टीकचे बीन्स वापरावेत.

----------

ठराव क्रमांक –१२८४ विषय क्रमांक – ८

दिनांक – १५/११/२०१७ विभाग–आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/३९९/२०१७ दि.०६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ब” क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं.४९, ५०, ५१ व ५३ तसेच "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं. ५८, ५९ व ६० मधील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ३८ वाहन चालक, २ सुपरवायझर व ७६ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र.४/२०१५-१६ प्रसिध्द करुन ८ महिने कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.९५,८१,२६८/- + सेवाशुल्क र.रु.९,५८,१२८/- अशी एकूण र.रु.१,०५,३९,३९६/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत होती. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता या निकषावर मागविण्यात आलेल्या निविदेत मे.श्री साई मागासवर्गीय स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांची सेवाशुल्काच्या ४३.८३% कमी दराने (र.रु.४,२०,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ५.१० % कमी दराने निविदा स्विकृत करुन, त्यांची दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करुन कामाचा आदेश देण्यात आला होता. निविदा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, नियुक्त ठेकेदार यांनी मुदतवाढ कालावधीत काम करणेस नकार दर्शविल्याने निविदेतील सेकंड लोएस्ट संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था दापोडी यांची मा. स्थायी समिती कडील ठराव क्र.१७२१९ दि.१४/०९/२०१६ व ठराव क्र.१७५३८ दि.२७/०९/२०१६ अन्वये दि.२४/०७/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ पर्यंत निविदेतील मंजूर दराने ठेकेदार म्हणून नियुक्ती करणेत आली होती. सदर कामाची मुदत दि.०२/०१/२०१७ अखेर संपुष्टात आली होती. त्यानुसार मा.स्थायी समितीकडील ठराव क्र. ४२७ दि.२४/०५/२०१७अन्वये सदर कामास दि.०३/०१/२०१७ ते ३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कामाची मुदतवाढ दि.३१/०७/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.९३० दि.१३/०९/२०१७ अन्वये दि.०१/०८/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे. व या कामास मुदतवाढ आदेश क्र.आमुका/३/कावि/३६९/२०१७, दि.०९/१०/२०१७ अन्वये देणेत आलेली आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. या कामाच्या नविन निविदेचे पहिले पाकीट ओपन केले असून त्यातील निविदाधारकांचे कागदपत्रांची तांत्रिक तपासणी चालू आहे. तसेच संपुर्ण निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था दापोडी यांची ठेकेदार

म्हणून दि.०१/११/२०१७ ते दि.३१/०१/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल तो पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.५८,२१,४२८/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८५ विषय क्रमांक – ९

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/४००/२०१७ दि.०६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचराडेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी “ब” व “क” प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी निविदा नोटिस क्र.५/२०११-१२ देशपातळीवर प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आलेली होती. मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. यांची प्राप्त कमी दराची निविदा प्रतीटन र.रु.७१४/- स्विकृत करुन मा. स्थायी समिती ठराव क्र.१५४९३ दि.२५/१०/२०११ व क्रमांक १६४२१ दि.२०/१२/२०११ अन्वये प्रथम वर्षासाठी प्रतीटन र.रु.७१४/- व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ५% दर वाढीस मान्यता देणेत आलेली आहे. त्यांनी दि.२९/१२/२०११ रोजी करारनामा सादर केलेला आहे. त्यानुसार ५ वर्षे कामाचा आदेश क्र.आमुका/३/कावि/०७/२०१२ दि. ०२/०१/२०१२ अन्वये देणेत आलेला आहे. तसेच ब, क व ई क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी कलेक्शन आणि अ, ड व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कचरा उचलणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेचे (सेकंडरी कलेक्शन) काम देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत दि.०२/०१/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्रं. १९४७९, दि. २३/१२/२०१६ अन्वये दि.०३/०१/२०१७ ते दि.३०/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. व या कामाचा आदेश क्रं. आमुका/३/कावि/२८/२०१७, दि.०१/०३/२०१७ देणेत आलेला आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र.३६० दि.११/०५/२०१७ अन्वये दि.०१/०५/२०१७ ते दि.३१/०७/२०१७ अखेर मागील दरामध्ये ५ टक्के वाढ करून मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. व या कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/२१४/२०१७, दि.१५/०६/२०१७ देणेत आलेला आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.९२५ दि.१३/०९/२०१७ अन्वये दि.०१/०८/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ अखेर मुदतवाढ देण्यास तसेच अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र. १४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व प्रभाग क्र. १८ व १९ मध्ये २ कॉम्पँक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) कामकाज मे. बी. व्ही. जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांचेमार्फत करणेत येत असल्याने त्यांना प्रति मे.टन र.रु.९११/- प्रमाणे बिल अदायगी करण्यास मान्यता मिळालेली आहे. याबाबात कामाचा आदेश क्रं. आमुका/३/ कावि/३५७/२०१७, दि.०३/०१/२०१७ देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. तथापी या कामाच्या नविन निविदेचे पहिले पाकीट ओपन केले असून त्यातील निविदाधारकांचे कागदपत्रांची तांत्रिक तपासणी चालू आहे. तसेच संपुर्ण निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे

वर नमूद केलेल्या कामासाठी मे.बी. व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांना ०३ महिने अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल तो पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.३,६९,४६,२९०/- (अक्षरी र.रु. तीन कोटी एकोणसत्तर लाख सेहचाळीस हजार दोनशे नव्वद फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८६ विषय क्रमांक – १०

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/४०२/२०१७ दि.०६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४७ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९४ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र.५/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६९,४६,६१२/-+ सेवाशुल्क र.रु.१६,९४,६६१/- अशी एकूण र.रु.१,८६,४१,२७३/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता हा निकष ठेवणेत आला होता. त्यानुसार मे. सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८१.५०% कमी दराने (र.रु.३,१३,५१०/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.४१% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे तसेच अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी आदेश क्र.आमुका/३/कावि/२००/२०१५ दि.२१/०७/२०१५ अन्वये दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. त्यानंतर सदर कामाची मुदत दि.२३/०७/२०१६ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्रं.१७१०५, दि.०६/०९/२०१६ अन्वये दि.२४/७/२०१६ ते दि.२/१/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस तसेच ३ सुपरवायजर व २ वाहनचालक जादा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. या कामास मुदतवाढ आदेश क्र.आमुका/३/कावि/६७२/२०१६ दि.२६/०९/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.०२/०१/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.२२६ दि.१९/४/२०१७ अन्वये दि.३/१/२०१७ ते दि.३०/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. व या कामास मुदतवाढ आदेश क्र.आमुका/३/कावि/१३०/२०१७ दि.२८/०४/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची दि.३०/०४/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.३७६ दि.१७/०५/२०१७ अन्वये दि.०१/०५/२०१७ ते ३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. व या कामास मुदतवाढ आदेश क्र.आमुका/३/कावि/२१८/२०१७

दि.१७/०६/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०७/२०१७ अखेर संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.९२७ दि.१३/०९/२०१७ अन्वये दि.०१/०८/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे. या कामास मुदतवाढ आदेश क्र.आमुका/३/कावि/३५८/२०१७, दि.०४/१०/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. या कामाची नविन निविदा कार्यवाही सुरु करणेत आली आहे. त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दि.०१/११/२०१७ ते दिनांक ३१/०१/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल तो पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या अंदाजे र.रु.७२,९२,०८८/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८७ | विषय क्रमांक – ११

दिनांक – १५/११/२०१७ | विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७२/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/२/२०१७-१८ प्रभाग क्र.२६ काळभोरनगर (नविन प्र.क्र.१४) काळभोरनगर मोहननगरमध्ये दिशादर्शक सुचना फलक रोड फर्निचर व स्थापत्य विषयक कामे करणेकामी M/s.Adept Enterprises नि.र.रु.२२,४०,६४२/- (अक्षरी र.रू.बावीस लाख चाळीस हजार सहाशे बेचाळीस फक्त) पेक्षा २४.१५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,९९,५२७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८८ | विषय क्रमांक – १२

दिनांक – १५/११/२०१७ | विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे | अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७४/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/११/२०१७-१८ प्रभाग क्र.१० मध्ये पेव्हींग ब्लॉक,पावसाळी गटर्स इ. स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.Dev Construction नि.र.रु.१९,५६,५७४/- (अक्षरी एकोणावीस लाख छप्पन हजार पाचशे चौ-याहत्तर फक्त) पेक्षा १९.७७% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने

र.रु.१५,६९,७५९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२८९ विषय क्रमांक – १३

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७५/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/१०/२०१७-१८ प्रभाग क्र.१८ मध्ये पेव्हिंग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.Dev Construction नि.र.रु.१९,६०,३७७/- (अक्षरी र.रू.एकोणावीस लाख साठ हजार तीनशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा १९.७७% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१५,७२,८१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२९० विषय क्रमांक – १४

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७६/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र १०/१/२०१७-१८ प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हिंग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.k.kamlesh नि.र.रुः १९,६०,७४९/- (अक्षरी अक्षरी एकोणावीस लाख साठ हजार सातशे एकोनपन्नास फक्त) पेक्षा १५.५० % कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु १६,५६,८३३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२९१ विषय क्रमांक – १५

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७७/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र १०/२९/२०१७-१८ प्रभाग क्र.१८ मध्ये दिशादर्शक फलक, साईड पट्टे व रोड फर्निचरची कामे करणेकामी M/s.Shriguru

Construction नि.र.रु.२२,४०,५३२/- (अक्षरी बावीस लाख चाळीसजार पाचशे बत्तीस फक्त) पेक्षा १७.१० % कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु १८,५७,४०१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२९२ विषय क्रमांक – १६

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७८/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/४/२०१७-१८ प्रभाग क्र.२५ मध्ये दिशादर्शक फलक, साईड पट्टे व रोड फर्निचरची कामे करणेकामी M/s.S.S.Enterprise S.M.Gupta नि.र.रु.२२,३९,६४८/- (अक्षरी र.रू.बावीस लाख एकोणचाळीस हजार सहाशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा १५.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु १८,९२,५०३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२९३ विषय क्रमांक – १७

दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५८०/१७ दि.७/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/२३/२०१७-१८ प्रभाग क्र.२६ अंतर्गत मनपा इमारतीची स्थापत्य विषयक कामे करणेकामी M/s.S.D.AJWANI नि.र.रु. १९,६०,७४७/- (अक्षरी र.रू.एकोणावीस लाख साठ हजार सातशे सत्तेचाळीस फक्त) पेक्षा १७.७१% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,१३,४९९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२९४ विषय क्रमांक – १८
दिनांक – १५/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५७९/१७ दि.५/११/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

